# विदेशी भाषा अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठामध्ये विदेशी भाषा विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या रशियन, जर्मन, जपानी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेश अर्ज भरण्याची मुदत दि. १० जुलै आहे. शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे एक वर्ष कालावधीचे रशियन, जर्मन, जपानी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात येतात. या अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रत्येकी ५० इतकी आहे. यासाठी १२ वी उत्तीर्ण किंवा समकक्ष अशी प्रवेश अर्हता आहे.

# शिवाजी विद्यापीठात वृक्षलागवड

कोल्हापूर : राज्य सरकारच्या ३३ कोटी वृक्ष लागवड मोहिमेसंदर्भातील आवाहनाला प्रतिसाद देत शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने परिसरात वृक्ष लागवड मोहिमेस प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रारंभ झाला. या मोहिमेअंतर्गत विद्यापीठ आवारात ४०० रोपे लावण्यात येणार आहेत.

यावेळी डॉ. शिर्के म्हणाले, 'राज्य सरकारने गेल्या चार वर्षांपासून वृक्षारोपण मोहिमेचा परीघ टप्प्याटप्प्याने वाढविला आहे. वृक्षारोपणाबद्दल नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती होऊन या मोहिमेला दरवर्षी वाढता आणि उत्साही प्रतिसाद लाभत आहे. वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंपदेचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या बाबतीतही नागरिकांत मोठी जागृती झाली आहे. शिवाजी विद्यापीठानेही सुरवातीपासून या मोहिमेला प्रतिसाद देताना आपल्या परिसरामध्ये वृक्षलागवड, त्यांचे संरक्षण व संवर्धन या बाबींकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरविले आहे. दरवर्षी विद्यापीठ परिसराच्या निरनिराळ्या भागांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे वृक्ष लावून संपूर्ण परिसरामधील हिरवे क्षेत्र वाढविण्याकडे विद्यापीठ प्रशासनाने लक्ष पुरविले आहे.

यंदाही विद्यापीठाने वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत सोमवारी सकाळी आठ वाजता विद्यापीठाच्या नागेशकर क्रीडा संकुल परिसरात कडुलिंब रोप लावून शुभारंभ केला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधीक्षक ए. के. जाधव यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच नागरिकांनीही वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेतला.



शिवाजी विद्यापीठात वृक्षारोपण करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमवेत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी.टी. गायकवाड आदी.

# विद्यापीठाचे जलसंधारण प्रेरणादायी

## नांदेड विद्यापीठ करणार अनुकरण; पाण्यासाठी विविध प्रकल्प राबविणार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : जलसंधारणाची कामे करून शिवाजी विद्यापीठाने राज्यात पाणीदार विद्यापीठ हा लौकिक मिळवला.

शिवाजी विद्यापीठाच्या या शाश्वत प्रकल्पाचे अनुकरण स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठानेही केले. त्यांनी विद्यापीठाच्या परिसरात जलसंधारणाची कामे करून 'पाणी अडवा आणि जिरवा' ही संकल्पना राबवली.

एकेकाळी शिवाजी विद्यापीठात पाण्याचे दुर्भिक्ष्य होते. पाण्यासाठी विद्यापीठाला महापालिकेवरच अवलंबून राहावे लागे. उन्हाळ्यात पाणीटंचाईची समस्या तीव्र बनवत होती. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपकुलसचिव डॉ.



व्ही. एन. शिंदे यांनी जलसंधारणाच्या कामाचे नियोजन केले. विद्यापीठाच्या परिसरात १० शेततळी आणि ९ विहिरी खोदल्या. यात सुमारे ३१ कोटी लिटर पाणी साठते.

हेच पाणी विद्यापीठात वापरले जाते. त्यामुळे पाण्याबाबतीत विद्यापीठ स्वयंपूर्ण झाले आहे. राजेंद्रसिंह राणा यांनी पाणीदार विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठाचा गौरव केला. याच पार्श्वभूमीवर नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठानेही जलसंधारणाचे विविध प्रकल्प राबवण्याचा निश्चय केला आहे. याची प्रेरणा आणि माहिती त्यांनी शिवाजी विद्यापीठातून घेतली आहे.

> **शिवाजी विद्यापीठाने राबवलेल्या उपक्रमांची माहिती मी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून घेतो. स्वामी रामतीर्थ विद्यापीठातील जलसंधारणाची कामे आम्ही युद्धपातळीवर सुरू केली. लवकरच एक टीम शिवाजी विद्यापीठात पाठवली जाईल. तेथील उपक्रमांची आणि जलसंधारणाच्या कामाचा अभ्यास ते करतील. लवकरच पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ.**
>
> **- कुलगुरू, डॉ. उद्धव भोसले,**
> स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

रामतीर्थ विद्यापीठाचा परिसर ५५० एकरांचा आहे. पूर्वी येथे काटेरी झाडे होती. पाण्याचेही दुर्भिक्ष्य आहे. या विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. उद्धव भोसले यांनी पदभार स्वीकारल्यावर हे चित्र बदलण्याचा संकल्प केला. त्यांनी काटेरी झाडे काढून टाकली. नवे वृक्षारोपण केले. पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी विद्यापीठ परिसरात जलसंधारणाचे प्रकल्प राबवले यामध्ये चरी खणणे, शेत तळी, छोटे नाले, विहिरी यांची उभारणीचे काम सुरू केले.

बांधबंधिस्तीची कामेही केली आहेत. तेथील छोट्या तळ्यातील सुमारे १२०० घनफूट गाळ त्यांनी काढला. यामुळे येणाऱ्या पावसाळ्यात विद्यापीठात पाणी साठेल. यात त्यांना सामाजिक संस्थांचीही मदत झाली आहे. शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचीव व्ही. एन. शिंदे यांनी तेथे भेट देऊन कामांची पाहणी केली.

# नवे शैक्षणिक धोरण सर्वसमावेशक

**शिवाजी विद्यापीठात आयोजित चर्चासत्रात सूर**

कोल्हापूर टाइम्स टीम


'केंद्र सरकारने नवे शैक्षणिक धोरण हे सर्वसमावेशक असून त्यामध्ये सर्व स्तरांवरील शिक्षणाचा साकल्याने विचार करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी तितक्याच प्रभावीपणे झाल्यास निर्धारित शैक्षणिक उद्दिष्टे गाठणे शक्य होईल,' असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष चर्चासत्रात उमटला.

विद्यापीठ व महाविद्यालय विकास विभागातर्फे 'नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर विशेष चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात संजय घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. बी. एम. हिर्डेकर, ज्येष्ठ अर्थ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील आणि विद्यापीठाच्या इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी 'संशोधन' या संदर्भातील तरतुदींवर प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. बी. एम. हिर्डेकर म्हणाले, 'शालेय शिक्षणामध्ये अभ्यासक्रमाचा बोजा कमी करून सर्वंकष कौशल्य विकासावर देण्यात आलेला भर महत्त्वाचा आहे. कोठारी आयोगाचा पहिली ते दहावी, दोन वर्षे उच्च माध्यमिक तीन वर्षे पदवी आणि दोन वर्षे पदव्युत्तर पदवी हा ५० वर्षे व्यवस्थित आणि यशस्वीपणे चालला. आता तो ५+३+३+४ असा बदलण्यात आला आहे. हा वयाधारित पॅटर्न नाही, तर सर्वांगीण विकासाभिमुख अशी त्याची निर्मिती करण्यात आली आहे. बालकांच्या भरणपोषणाबरोबरच शिक्षण प्रक्रियेला देण्यात आलेले महत्त्व नोंद घेण्यासारखे आहे.'

उच्चशिक्षणविषयक तरतुदींचा वेध घेताना डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, 'बारावीपर्यंतचे सर्व शिक्षण मोफत, सक्तीचे आणि देशभरात एकजीनसी, एकाच पॅटर्नचे करण्याचे महत्त्वाचे काम नव्या शैक्षणिक धोरणाने साध्य होणार आहे. उच्चशिक्षणाची पुनर्रचना आणि नवनिर्माण असे दुहेरी उद्दिष्ट धोरण बाळगून आहे. जागतिक दर्जाच्या बहुविद्याशाखीय शिक्षण संस्थांची निर्मिती करून त्या माध्यमातून सन २०३०पर्यंत ग्रॉस एन्रोलमेंट रेशो (जीआआर) ५० टक्क्यांच्या घरात नेण्याचे उद्दिष्टही आहे. बुद्धिमान, सेवाव्रती आणि सशक्त नैतिक मूल्याधारित संपूर्ण व्यक्तीमत्त्वाची माणसे घडविली जावीत, अशी अपेक्षा धोरणात आहे.'

नव्या धोरणामधील संशोधनविषयक तरतुदींचा वेध घेताना डॉ. आर. के. कामत म्हणाले, 'नव्या शैक्षणिक धोरणात एकविसाव्या शतकाची कौशल्ये शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना देण्याची योजना महत्त्वाची आहे. त्यासाठी आंतरविद्याशाखीय व बहुविद्याशाखीय शिक्षणपद्धतीचा अंगिकार ही क्रांतीकारी बाब आहे. संशोधनाच्या दृष्टीने नॅशनल रिसर्च फाउंडेशनच्या स्थापनेची शिफारस अत्यंत महत्त्वाची आहे. आता राष्ट्रीय विकासाचे केवळ भागीदार नव्हे, तर निर्माण प्रक्रियेचे शिलेदार होण्याच्या दिशेने विद्यार्थ्यांना घडविणारे हे धोरण आहे. देशात खऱ्या अर्थाने संशोधनाची संस्कृती व क्षमता निर्माण करण्याच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या बाबींचा समावेश या धोरणात आहे.'



प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, 'शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्वच घटकांनी नव्या शैक्षणिक धोरणाचा संपूर्ण मसुदा शब्दनिहाय समजून घेणे आवश्यक आहे. त्यातील कित्येक बाबी अगदी आजही प्रचलित असणाऱ्या व्यवस्थेमध्ये अंगीकृत करणे, अंमलात आणणे सहजशक्य आहे. त्या दृष्टीने त्याचा विचार होणे आवश्यक आहे. काही बाबी त्रुटीपूर्ण किंवा सदोष आहेत, अशी भावना असेल, तर त्यांचे पुनरावलोकन करून त्या निरसित करण्याची शिफारस करीत असताना त्याला पर्यायी व्यवस्था काय असावी, यासंदर्भातील दिग्दर्शन करणेही महत्त्वाचे आहे.'

यावेळी झालेल्या चर्चेमध्ये माजी आमदार भगवानराव साळुंखे, डॉ. भालबा विभुते, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. नीलेश बनसोडे, डॉ. मेघा पानसरे आदींनी सहभाग घेतला. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर श्रीमती टी. एस. भुतकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.